# प्रेस नोट

दिनांक १३/०७/२०२४

## शेअर मार्केटमध्ये रक्कम गुंतविल्यास भरघोस नफा मिळवून देण्याचे प्रलोभन दाखवून गुंतवणूकदारांची फसवणूक केलेल्या आरोपीस अटक करुन गुन्हा उघडकीस आणण्यात मालमत्ता कक्ष, गुन्हे शाखेस यश

-------------

मालमत्ता कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई गु.प्र.शा., गु.अ.वि., गु.र.क्र. ५९/२०२४, कलम ४०६, ४०९, ४२०, ५०६(२) भादंविसह सह कलम ३, ४ महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तिय संस्थांमधील हितसंबंधाचे संरक्षण) अधिनियम १९९९ (MPID)(वर्सोवा पोलीस ठाणे, मुंबई गु.र.क्र. ३९८/२०२४) या फसवणूकीच्या गुन्हयातील अटक आरोपी आशिष दिनेश कुमार शहा, वय ४४ वर्षे, रा.ठि. वर्सोवा, मुंबई याने परिसरातील परिचयाचे लोकांना त्याची स्वत:ची समरयश ट्रेडिंग कपंनी ही सेबी रजिस्टर्ड असल्याचे सांगून तो शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवितो व त्यातून मिळणाऱ्या पैशातून ऑफिस, घर, वाहने, सोने हे सर्व कमावले आहे असे चित्र दाखवितो. आरोपीने ''तुम्ही माझेकडे शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवा, मी सेबीचा रजिस्टर्ड एजंट आहे. तुम्हाला वर्षाला ८४ टक्के परतावा देतो'' असे सांगून लोकांकडून पैसे गोळा केले. लोकांचा विश्वास संपादन करण्याकरिता काही लोकांना परतावा दिला. त्यामुळे अनेक लोकांनी आरोपीकडे विश्वासाने पैसे गुंतविले आहेत.

अटक आरोपीविरुध्द फिर्यादी यांचे प्राप्त तक्रारीनुरुप चौकशी करुन तांत्रिक तपासाअंती व आरोपीविरुध्द प्राथमिक पुरावे प्राप्त झालेनंतर गुन्हा नोंदविण्यात आला. तसेच गुन्हयातील आरोपी हा दोन महिन्यापूर्वीच परागंदा झाल्याने त्याचे ठावठिकाणाबाबत शोध घेण्यात येत होता. नमूद प्रकरणाचे संबंधाने मिळालेल्या गोपनीय माहितीचे तांत्रिक विश्लेषण करुन त्याअनुषंगाने आरोपीचा शोध घेणेकामी एक पोलीस पथक मध्य प्रदेश राज्य येथे पाठविले असता आरोपी सतत ठावठिकाणे बदलत असल्याने पथक तेथे तळ ठोकून होते. आरोपीबाबत सखोल तपास करुन, पाळत ठेवून त्यास तांत्रिक तपास व स्थानिक पोलीसांचे मदतीने अटक करुन मुंबईत आणण्यात आले.

**अटक आरोपीकडून अंदाजे १९०० ग्रॅम्स सोन्याचे दागिने व रोख रक्कम रुपये २५ लाख हस्तगत करण्यात आली आहे.**

त्याने सदरची रक्कम व सोने हे गुंतवणूकदार/ठेवीदार यांचेकडून शेअर मार्केटमध्ये नफा मिळवून देतो असे आश्वासने/प्रलोभने दिलेल्या रक्कमेतून घेतले असल्याची प्राथमिक माहिती समजून आली आहे. सदरबाबत अधिक सखोल तपास करण्यात येत आहे. तसेच आरोपीकडे केलेल्या प्राथमिक तपासात मुंबई वगळता मिरा-भाईंदर, तामिळनाडू येथील लोकांनी पैसे गुंतविल्याची माहिती प्राप्त आहे. सर्वसाधारणपणे ४०० ते ५०० लोकांची फसवणूक करुन आरोपीने काही करोडोपेक्षा जास्त रक्कमेची फसवणूक केली असण्याची शक्यता आहे. आरोपीविरुध्द महाराष्ट्राबाहेर तामिळनाडू येथे गुन्हे दाखल असण्याची शक्यता आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त श्री देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री शशि कुमार मीना, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री दत्ता नलावडे यांचे मार्गदर्शनाखाली मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डी विशेष) श्री. दत्तात्रय नाळे यांच्या देखरेखीखाली मालमत्ता कक्ष, गु.प्र.शा., मुंबई या कक्षाचे प्रभारी पोलीस निरीक्षक मंगेश देसाई, पो.नि. प्रविण मोहिते, पो.नि. अरुण थोरात (खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा), पो.उप.निरी. प्रकाश गवळी (एस.आय.टी., गुन्हे शाखा), पो.ह. अरुण सावंत, चिंतामण इरनक, तुषार सावंत (मालमत्ता कक्ष, गुन्हे शाखा), पो.ह. अशोक शिंदे, सचिन ननावरे, पो.शि. मयुर थोरात (एस.आय.टी., गुन्हे शाखा) यांनी बजावलेली आहे.

-------------

Scanned with CamScanner